# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५२२/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. सी. जे. पिन्टो**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा.मनपा आयुक्त, एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय
प्लॉट नं.१३७, टीपीएस-५, दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व) मुंबई -५५.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा.मनपा आयुक्त, एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय
प्लॉट नं.१३७, टीपीएस-५, दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व) मुंबई -४०० ०५५.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १२.०३.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. १०२४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. ४४१/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०६.०८.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना १५ दिवसांत उपलब्ध माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. २९.११.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. मनपा आयुक्त, एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि.०७.०१.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. मनपा आयुक्त, एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगास अहवाल अप्राप्त आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी असे सादर केले की, आयोगाच्या दि. ०६.०८.२०१९ रोजीच्या आदेशानुसार अद्याप कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दि. १२.०३.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, तत्कालिन जन माहिती अधिकारी यांची बदली झालेली व ते स्वत: २ वर्षापासून कार्यरत आहेत. तसेच त्यांनी तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत माहिती देण्याचे मान्य केले.

..२/-

तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश दि. ०६.०८.२०१९ च्या अनुषंगाने आतापर्यंत तक्रारकर्ता यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणी उपस्थित रहावे. तसेच, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी यांनी आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत तक्रारकर्ता यांना माहिती द्यावी व आतापर्यंत तक्रारकर्ता यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०९.०४.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : १७.०३.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५२२/२०१९**
**तक्रारकर्ता श्री. सी. जे. पिन्टो**
**सुनावणी दिनांक : १६.०४.२०२५ (In continuation of order dt १७.०३.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश दि. ०६.०८.२०१९ च्या अनुषंगाने आतापर्यंत तक्रारकर्ता यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणी उपस्थित रहावे. तसेच, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी यांनी आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत तक्रारकर्ता यांना माहिती द्यावी व आतापर्यंत तक्रारकर्ता यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०९.०४.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, माहिती बाबत पुन्हा या कार्यालयाने कसून शोध घेतला. परंतु सदर माहिती ही कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नाही.

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसांत निशुल्क माहिती देण्याचे आदेशित केलेले आहे. तसेच आयोगाने जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत निशुल्क माहिती पुरवावी असे आदेशित केले आहे. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगणे की, माहिती उपलब्ध नाही हे योग्य वाटत नाही.

आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांना देण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०९.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

17-4-2025

**मुंबई**
**दिनांक : १७.०४.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**